दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक १०९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१३ जुलै २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## रोहा केळघर मुरुड मार्गावर दरड कोसळली, रस्ता वाहतुकीसाठी बंद

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा केळघर मार्गे मुरुड मार्गावरील केळघर आदिवासी वाडी नजीक मुसळधार पावसात दरड कोसळली, रस्त्याच्या मधोमध मोठमोठ्या दगडीसह माती झाडे पडल्याने रस्ता पूर्ण बंद झाला. रस्त्यावर दगड, मातीसह मोठ मोठी झाडे उलमलून पडली असून कोणतीही जीवीत हानी झालेली नाही.

मागील १७ जून रोजी याच मार्गावर दरड कोसल्याची घटना घडली होती, सोमवारी पुन्हा मुसळधार पावसामुळे या ठिकाणी दरड कोसळून मार्गावर पडली असल्याने रोहा केळघर मुरुड मार्ग बंद झाला आहे. तर कोसळलेल्या दरडीमुळे शेती आणि रस्ता मार्गाचे खूप मोठे नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाज आहे.



# मुरुडमध्ये अतिवृष्टी ; शहराचा संपर्क तुटला


## काशिदचा जूना पूल कोसळला ; दुर्घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । मुरुड**

गेल्या आठ ते दहा दिवस दडी मारलेल्या पावसाने मुरुड तालुक्यात रविवारी सायंकाळपासून आपले रौद्ररूप धारण केले. सकाळी दहा वाजेपर्यंत सुमारे ३५० मि मि पावसाची नोंद झाली आहे तरीही पावसाची संततधार सुरूच होती.

मुरुड शहरासह तालुक्यात गावांमध्ये पाच ते सहा फूट पाणी साचले. बरेच नागरिकांच्या घरामध्ये पाणी शिरल्याने त्यांचे नुकसान झाले आहे तसेच बऱ्याच शेतकऱ्याचे भातशेतीची रोपे वाहून गेली आहेत. नुकत्याच लावणी केलेली रोपे सुद्धा वाहून गेली आहेत. मुरुडमधील शिघ्रे नदीला पूर आला असून गावात पाणीच पाणी झाले आहे तसेच उसरोली नदीही जलमय झाली असून रस्त्यात पाच ते सहा फूट पाणी असल्याने हा रस्ताही बंद करण्यात आला आहे. तसेच काशीद मध्ये पूल कोसळल्याने तोही रस्ता बंद आहे. त्यामुळे अलिबागमार्गे मुरुडचा संपर्क तुटला आहे. तसेच रोहा केळघर मार्गावरील कवळठे परिसरात दरड कोसळल्याने तोही रस्ता बंद करण्यात आला आहे. मुरुड लक्ष्मीखार, राजपुरी इथंही घरांमध्ये पाणी शिरल्याने प्रचंड नुकसान झाले आहे. मुरुड तालुक्यातील नांदगाव परिसर जलमय झाला आहे. समुद्रही खवळला असून लाटांनी रौद्ररूप धारण केले आहे. मुरुड तहसीलदार गमन गावित तसेच तालुका आपत्ती व्यवस्थापन कक्षातर्फे तालुक्यातील नागरिकांनी बाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे. तसेच तातडीची गरज भासल्यास आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.





## काशिदचा पुल कोसळला ; १ ठार

अलिबाग–मुरुड तालुक्याला जोडणारा दुवा असलेला काशिदचा जूना पूल कोसळला. यामध्ये जिवित व वित्त हानी झाली असून सहा प्रवाशांना ग्रामस्थांच्या मदतीने सुखरूप बाहेर काढण्यात यश आले असून एक मोटारसायकल स्वाराला आ–पला जीव गमवावा लागला तर वाहनाचे नुकसान झाले आहे. काशिदचा जूना पूल धोकादायक असल्याबाबतचे वृत्त नुकतेच वृत्तपत्रातून देण्यात आले होते.

अलिबाग–साळाव– मुरुड रस्त्यावरील काशिद बिचजवळील पन्नास वर्षे जुना पूल जोरदार पावसात वाहून गेला आहे. सदर घटना दि ११ जुलैच्या रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडली असून मुरुड तालुक्यात पावसाची संततधार सुरु आहे. नदीत आलेल्या पाण्याच्या जोरदार प्रवाहाने हा पन्नास वर्षाचा जीर्ण झालेला पूल वाहून गेला.

एक चार चाकी वाहन व दोन मोटारसायकल सह पूल कोसळला असून मोटार सायकल स्वार पाण्यात वाहून गेला. त्याचा शोध घेतला असता त्याचा मृतदेह मिळाला आहे. मृत व्यक्ती मुरुड एकदरा येथिल असून त्याचे नाव विजय चव्हाण आहे. अशी माहिती मुरूडचे नायब तहसिलदार रवींद्र सानप यांनी दिली आहे.

दरम्यान, अलिबाग–मुरुड रस्त्यावर काशिद पूल कोसळल्याने या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली असताना आज सकाळपासून जोरदार पडत असलेल्या पावसामुळे मुरुडकडे जाणा–या सुपेगांव मार्गावरील उसरोली नदीचे पाणी ओसांडून वाहत असल्याने उसरोली, मजगाव येते पाणीच पाणी झाल्याने ह्याही मार्गावरील वाहतूक ठप्प होऊन मुरुड आलिबाग जाण्याचा संपर्क तुटला असल्याचे समजते.



## संक्षिप्त...

### कोकणात पूरस्थिती; मुंबई-गोवा महामार्ग ठप्प होण्याची शक्यता

**रत्नागिरी : वृत्तसंस्था**

कोकणातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस कोसळत आहे. परिणामी अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे. राजापूरमध्ये अजूनही मुसळधार पाऊस सुरू असून अर्जुना व कोदवली नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे. तसंच पूर रेषा ओलांडली गेल्यामुळे प्रशासनकडून अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुन्हा जिल्ह्यात जोरदार पावसाचा इशारा दिल्याने सतर्कतेच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

मुंबई–गोवा महामार्गावरील ब्रिटिशकालीन पूल व विविध भागाची पाहणी जिल्हाधिकारी संजय शिंदे, प्रांताधिकारी बनसोडे, तहसीलदार प्रतिभा वराळे, नगराध्यक्ष जमीर खलिफे यांनी अधिकाऱ्यांसोबत केली आहे. पावसाचा जोर वाढल्यास मुंबई गोवा महामार्गावरील ब्रिटिशकालीन पुलावरील वाहतुकीस धोका निर्माण होऊ नये म्हणून प्रशासनाकडून योग्य खबरदारी घेतली जात आहे. पूररेषा ओलांडल्यास प्रशासनाकडून खबरदारीकरता महामार्गावरील वाहतूक बंद करण्यात येईल.


गेल्या काही दिवसांतील सततच्या पावसामुळे रत्नागिरीतील वशिष्ठी नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली असून पुराचे पाणी चिपळूण शहरात शिरण्यास सुरुवात झाली आहे. खबरदारी म्हणून जुना बाजार पूल वाहतुकीस बंद करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. शहरातील चिंच नाका, वड नाका, नाईक कंपनी परिसरात पुराचे प्रचंड पाणी साचलं आहे.

तळकोकणात काल दुप–ारपासून पावसाचा धुमाकूळ सुरू असून संगमेश्वर, माखजन, लांजा,राजापूरमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. गड नदीच्या पूरस्थितीमुळे माखजन,संगमेश्वर बाजारपेठा पाण्याखाली जाऊन खाडी पट्ट्यातील घरांमध्ये पाणी शिरल्याने नुकसान झालं आहे.

## पनवेल तहसिलदारांची बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्यांवर धडक कारवाई

### वाळू उत्खनन करणाऱ्या बोटी केल्या नष्ट





**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमधील रोडपाली व वाघिवली येथे अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याबाबतच्या वारंवार तक्रारीनुसार पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली. त्यामुळे बेकायदेशीर वाळू उत्खनन करणाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

आज (१२ जुलै) सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास रोडपाली, वाघिवली हद्दीत ओहोटीच्या वेळी बेकायदेशीररित्या एका बोटीच्या सहाय्याने वाळू उपसा होत असल्याची गोपनीय तक्रार प्राप्त होताच सकाळी अकरा वाजता भरती सुरू झाल्यानंतर पनवेल तह–सील कार्यालयाचे पथक त्याठिकाणी बारा वाजण्याच्या सुमारास पाठवण्यात आले.

सदर ठिकाणी पथकाला चार अनधिकृत बोटी दिसून आल्या. मात्र कारवाईसाठी आलेल्या कर्मचार्यांना पाहताच बोटीतील वाळू उपसा करणानी तेथून पळ काढला. परंतु त्याजागी अवैध वाळू उपसा करणार्या बोटी असल्याने त्या पथकामार्फत नष्ट करण्यात आल्या. सदरची कारवाई पनवेल तहसीलदार विजय तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तलाठी मंडळ अधिकाऱ्यांच्या दोन पथकांनी केली.

पनवेल परिसरात अनेक ठिकाणी संधीचा फायदा घेऊन बेकायदेशीररित्या वाळुमाफिया सक्रिय झाले होते. विशेषतः रात्रीच्या वेळेला वाळू उत्खनन केले जात असल्याचे प्रकार तक्रारदारांनी केलेल्या तक्रारीनंतर समोर आले होते. त्या अनुषंगाने तहसीलदार विजय तळेकर यांनी वाळू माफियांवर कारवाईचा बडगा उगारला असून यापूर्वीही अनेकदा वाळू उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई केली आहे.

तरीदेखील काहीजण छुप्या पद्धतीने अवैध वाळू उपसा करत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली वाळू उपसा करणार्या बोटी नष्ट करण्यात आल्याने वाळू माफियांचे मात्र चांगलेच धाबे दणाणले आहेत.

## युवतीला फसवणाऱ्या बंगाली बाबास अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रेमभंग झालेल्या युवतीस लाखो रुपयाला गंडा घालणाऱ्या एका भोंदू बंगाली बाबास गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने गजाआड केले आहे.

खारघर येथे राहणारी एक २६ वर्षे युवती फेब्रुवारी २०२१ मध्ये प्रेम भंग होऊन प्रियकराने लग्नास नकार दिल्याने ती डिप्रेशनमध्ये गेली होती. सदर युवती ट्रेनने प्रवास करीत असताना तीने 'प्रेमसंबंधातील अडचणींवर उपाय पाहीजे असल्यास ९९३०६९४३६० या मोबाईल क्रमांकावर संपर्क करा' असे लिहिलेली जाहिरात पहिली. तीने सदर मोबाईल क्रमांकवर संपर्क साधला असता समोरील इसमाने तो बाबा कबिर खान बंगाली असल्याचे सांगीतले व त्याने मेरठ येथील दर्ग्यामध्ये सदर युवतीचा प्रियकर पुन्हा लग्नास तयार होण्यासाठी व त्याचे ठरलेले लग्न मोडण्यासाठी काळी जादु करावी लागेल व देवासाठी घुबड, बकरी अशा प्राण्यांचा बळी द्यावा लागेल असे सांगुन वेळोवेळी सदर युवतीकडुन पुजा विधिसांठी लागणार खर्च म्हणून् ४,५७,०००/– रु घेतले. हे करुन देखील काहीच फरक पडत नसल्याने नैराश्य आल्याने सदर युवती ने बाबा कबिर खान बंगाली यास दिलेले पैसे परत मागितले व पोलीसांकडे तक्रार देईन असे सांगीतले त्यावर बाबा बंगाली याने तक्रार देण्यासाठी पोलिसांकडे गेल्यास काळी जादु करुन अपघात घडवुन आणेन व तिला नष्ट करेन असे धमकावल्याने सदर युवतीने खारघर पोलीस ठाणे, येथे .../२



## जिल्हा कारागृहातील ६९ कैद्यांना कोरोनाची लागण

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आज अलिबाग तालुक्यात आढललेल्या १०१ रुग्णांमध्ये अलिबाग येथील जिल्हा कारागृहातील ६९ कैद्यांचा समावेश आहे. कोरोनाचा संसर्ग झालेल्या या कैद्यांना नेहुली येथील कोव्हीड केअर सेंटरमध्ये हलविण्यात आले आहे. उपचारादरम्यान दोन रुग्णांचा मृत्यू झाला. तर १०२ रुग्णांना बरे वाटल्याने त्यांना घरी सोडण्यात आले आहे.

जिल्हा कारागृहातील काही कैद्यांमध्ये कोरोनाची लक्षणे दिसली त्यामुळे सर्व कैद्यांची कोरोना टेस्ट करण्यात आली.

यात ६९ कैद्यांचा कोरोना रिपोर्ट पॉझिटीव्ह आला आहे. या कैद्यांना अधिक उपचारासाठी नेहूली येथे जिल्हा क्रीडा संकुलात सुरू करण्यात आलेल्या कोव्हीड केअर सेंटरमध्ये दाखल करण्यात आले आहे. आतापर्यंत अलिबाग तालुक्यात १७ हजार ३५६ संसर्गित रुग्ण आढळले असून त्या पैकी १५ हजार ६५३ रुग्ण उपचारा नंतर बरे झाल्याने त्यांना घरी सोडण्यात आले.

तर उपचारा दरम्यान ४९४ रुग्णांचा मृत्यू झाला. तर सद्यस्थितीत १ हजार २०९ रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

## चिरनेरच्या अक्कादेवी धरणावर पर्यटकांचा धिंगाणा

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

कोरोना संसर्गाचा धोका असल्यामुळे नागरीकांनी कुठेही गर्दी करून नये असे शासनाचे आदेश असताना देखिल बंदी आणि लॉकडाऊन झुगारून रविवारी चिरनेरच्या अक्कादेवी धरणावर पर्यटकांनी तुफान गर्दी केली होती. दिवसभर या ठिकाणी मद्यधुंद पर्यटकांचा धिंगाणा सुरू होता. येथे आलेल्या पर्यटकानी या पवित्र भूमीवर दारूच्या बाटल्या आणि कचऱ्याचा खच टाकला आहे. याचा त्रास येथे राहणाऱ्या गरीब आदिवासीना सहन करावा लागत आहे.

चिरनेर जंगल सत्याग्रह ज्या ठिकाणी झाला त्या ठिकाणी जंगल सत्याग्रहाच्या स्मृती म्हणून येथे एक छोटेखानी धरण बांधले आहे. थोड्याश्या पावसात देखिल हे धरण तुडूंब भरून ओसंडून वाहत असते. या ठिकाणी चिरनेर जंगल सत्याग्रहातील आदिवासी हुतात्मा नाग्या कातकरी यांचे स्मारक देखिल आहे. त्यामुळे ही पवित्र भूमी म्हणून ओळखली जाते.



पावसाळ्यात अनेक पर्यटक या ठिकाणी येतात. मात्र मागील वर्षीपासून कोरोना महामारीमुळे येथे पर्यटकांना येण्यास ग्रामपंचायतीने बंदी घातली आहे. मात्र असे असताना देखिल लॉकडाऊनचे .../२

## चुकीच्या पद्धतीने लावलेला टॅक्स रद्द होत नाही तो पर्यंत शेकाप शांत बसणार नाही : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना काळ असताना सुद्धा पनवेल महानगरपालिकेने करांमध्ये सवलत देण्याचे सोडून अन्यायकारक रित्या वाढ केलेली आहे याविरुद्ध आज खांदा कॉलनी रहिवासीयांनी एकत्र येत निषेध नोंदवला. नागरिकांनी कोणत्याही प्रकारचा चुकीच्या पद्धतीने लावलेला टॅक्स न भरण्याचे आवाहन विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी केले आणि जोपर्यंत चुकीच्या पद्धतीने लावलेला टॅक्स रद्द होत नाही तोपर्यंत शेतकरी कामगार पक्ष शांत बसणार नाही , शेकाप नागरिकांच्या पाठीशी भक्कम पणे आहे असे सांगितले.

पनवेल महानगर पालिकेने आतापर्यंत फक्त कचराच सिडकोकडून हस्तांतरित करून घेतलेला आहे आणि त्यातही मोठा भ्रष्टाचार कचरा उचलण्याचे टेंडर मध्ये केलेला आहे असे असताना सुद्धा महानगरपालिका अन्यायकारक रित्या टॅक्स लावत आहे असे शेकाप नेते वाघमारे यांनी लोकांच्या निर्दशनास .../२



# अतिपरिचय आणि अवज्ञा

पृथ्वीवरच्या प्रत्येक माणसाचे मन, बुद्धी, भावना, सामाजिक वर्तन, राजकीय दृष्टिकोन, नातेसंबंध, व्यक्तिगत व सामूहिक आकांक्षा हे सारे ताब्यात घेऊन त्यांना हवे तसे वळविण्याचा चंग बांधलेल्या समाजमाध्यमांना कोण कसे आवरणार, हा काही फक्त भारतापुढचा प्रश्न नाही. जगातले सगळे जागृत देश याचा सामना करीत आहेत. काही युरोपीय देशांनी समाजमाध्यमांवर होणारे अतिरंजन, असत्यसंचार किंवा अपप्रचार आवरण्याचा आटोकाट प्रयत्न केले. त्यातले काही यशस्वी झाले. मात्र, कोणतेही निर्बंध एक तर अंगाला लावून घ्यायचे नाहीत किंवा अंगाला तेल लावलेल्या पैलवानाप्रमाणे त्यातून सुटण्यासाठी युक्तिवाद, कज्जेदलाली, माध्यमस्वातंत्र्याची गळचेपी होत असल्याची हाकाटी पिटायची किंवा सरळ सरकारांच्या लोकशाहीनिष्ठेवर आरोप करावयाचे अशी विविध तंत्रे समाजमाध्यमांच्या मालक कंपन्या वापरतात. भारतात गेले काही महिने सतत या कंपन्या व सरकार यांच्यात संघर्ष होत आहेत. फेसबुकची उपकंपनी असणाऱ्या व्हॉट्सॲपने दिल्ली उच्च न्यायालयात दाखविलेल्या तयारीमधून एक पाऊल मागे घेतल्यासारखे दिसत असले तरी ती तात्पुरती खेळी असू शकते. व्हॉट्सॲपने काही काळापूर्वी जाहीर केलेल्या नव्या धोरणावर बरीच टीका. व्हॉट्सॲप आणि फेसबुक यांच्याकडे जमा होणारी अवाढव्य माहिती स्वत: व्यावसायिक कारणांसाठी वापरणे, ती इतरांना देणे किंवा ग्राहकांच्या व्यक्तिगत माहितीची गोपनीयता धुडकावणे या कारणांवरून या कंपन्यांवर टीका होते आहे. इतरांवरही होते. व्हॉट्सॲपने यासंबंधी भारतात नवे धोरण आणल्यामुळे हा मुद्दा ऐरणीवर आला. आता या कंपनीचे वकील हरीश साळवे हे 'केंद्र सरकारचे 'डेटा संरक्षण विधेयक' मंजूर होईपर्यंत फेसबुक आपली नियमावली जाहीर किंवा लागू करणार नाही,' असे उच्च न्यायालयाला सांगत आहेत. याचा अर्थ, उद्या हे विधेयक मंजूर होऊन तसा कायदा झालाच तर फेसबुक सर्वोच्च न्यायालयात जाणारच नाही, असे नाही. जगभर अशा कायदेशीर लढाया लढण्याचा अनुभव या कंपन्यांकडे असतो. या साऱ्या विषयाकडे केंद्र सरकार, न्यायव्यवस्था आणि कायदे राबविणाऱ्या यंत्रणा यांनी केवळ एकच निकष लावून पाहायला हवे आणि तो म्हणजे लोकहित. भारतीय नागरिकाचे खासगीपण, त्याचे निवडीचे स्वातंत्र्य, त्याचे राज्यघटनेने संरक्षण दिलेले अभिव्यक्तीचे किंवा मुक्त संवादाचे अधिकार यांची जपणूक होणे, हेच सर्वांत महत्त्वाचे आहे. मात्र, सगळ्यांच सरकारांना लोकहिताचा मुद्दा पुढे करून आज्ञाधारक न वाटणाऱ्यांचे (निदान) हात पिरगाळण्याचा मोह होत असतोच. त्यामुळे, देशातील ७८ खासगी वृत्तवाहिन्यांच्या याचिकेवर केरळ उच्च न्यायालयाने दिलेला आदेशही महत्त्वाचा ठरतो. या वृत्तवाहिन्यांची प्रातिनिधिक संघटना असणाऱ्या 'न्यूज ब्रॉडकास्टिंग असोसिएशन'ने (एनबीए) 'केंद्र सरकारचे नवे इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीचे नियम हे अनिर्बंध अधिकार देणारे आणि त्यामुळे, माध्यमांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अवकाश संकुचित करणारे आहेत,' असा युक्तिवाद केला होता. तो केरळ उच्च न्यायालयाने मान्य केला असून आता हेही प्रकरण काही दिवसांत सर्वोच्च न्यायालयात जाईलच. याशिवाय, आणखी एक प्रकरण कर्नाटक उच्च न्यायालयासमोर चालू आहे. काही दिवसांपूर्वी एका वृद्ध मुस्लिम नागरिकाला दमदाटी व मारहाण होत असल्याचा व्हिडिओ आधी ट्विटर व नंतर इतर सर्व समाजमाध्यमांवर प्रसारित झाला होता. याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी ट्विटर कंपनीने घ्यावी, यासाठी ट्विटर इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक मनीष माहेश्वरी यांच्यावर गाझियाबाद पोलिसांनी नोटीस बजावली आहे. प्रथमदर्शनी ही नोटीस व तिचे कारण योग्य वाटते. कर्नाटक उच्च न्यायालय या प्रकरणाकडे कस पाहते, हे आता निकालातून कळेल. मात्र, न्यायालयाने माहेश्वरी यांना अंतरिम संरक्षण दिले आहे, हे विसरता येत नाही. खरे तर, 'समाजमाध्यमांनी (समाजाप्रती असणाऱ्या) उत्तरदायित्वाचा विसर पडू देऊ नये,' असे सर्वोच्च न्यायालयाने सुनावल्याला फार दिवस झालेले नाहीत. दिल्ली अशांत असताना फेसबुकने जे काही चिथावणीखोर प्रक्षेपण केले, त्यावरून दिल्ली विधानसभेच्या समितीने या कंपनीचे उपाध्यक्ष अजित मोहन यांना पाचारण केले होते. 'तुम्ही अनेकदा मूक समाजाचा आवाज होता. मात्र, तुमच्या माध्यमातून प्रक्षोभक व आक्षेपार्ह मजकूरही समाजभर होतो,' अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने फेसबुकचे कान पिळले. ते निरीक्षण सर्वच माध्यमांना लागू पडणारे आहे. समाजमाध्यमांचा अतिपरिचय हे एका वेगळ्या पातळीवरचे संकट ठरत असताना ही माध्यमे भारतीय कायदे व नियमांची सतत अवज्ञा करीत राहतील तर हेच निमित्त होऊन केंद्र सरकारच्या हातातील काटेरी काठीची लांबी वाढत राहील. ते लोकशाहीच्या हिताचे नाही. पण एवढी प्रौढ समज केवळ धंद्यावर डोळा ठेवणाऱ्यांना कुठून असणार?

# श्रीवर्धनमध्ये धुवाँधार पावसामुळे रस्ते पाण्याखाली ; परिसरातील गावांचा बोर्लीपंचतन शहराशी संपर्क तुटला



**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यात तीन दिवस सतत पावसाने जोरदार हजेरी लावल्याने बोर्लीपंचतन शहराला जोडणारे मार्ग पाण्याखाली आले आहेत. सर्वत्र पाण्याची पातळी वाढल्याने समुद्राला उधाण आले आहे. परिणामी लहान – मोठे रस्ते बंद झाल्याने परिसरातील चाळीस गावांचा संपर्क तुटला आहे. यामुळे श्रीवर्धन तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे.

मागील दोन आठवड्यात दडी मारून बसलेल्या पावसाने शनिवारी सायंकाळी सोसाट्याचा वाऱ्यासह पावसाची सुरुवात झाली. पावसाने तीन दिवस गाजवल्यामुळे रविवारी पर्यंत बोर्लीपंचतन शहराला जोडणारे अनेक मार्ग पाण्याखाली गेले आहेत. तर गावामध्ये खलीपे कॉलनी अशा सखल भागात पुराचे पाणी शिरले आहे. याशिवाय हे पाणी घरात शिरल्याने मोठ्या प्रमाणात घरातील वस्तूंचे नुकसान झाले.

यातील बोर्लीपंचतन शहराला जोडणारे प्रमुख मार्ग श्रीवर्धन – बोर्लीपंचतन, म्ह–सळा – बोर्लीपंचतन तसेच बोर्लीपंचतन – शेखाडी – श्रीवर्धन मार्ग पाण्याखाली आल्याने अनेक गावांचा बोर्ली शहराशी संपर्क तुटला. यामध्ये श्रीवर्धन – बोर्लीपंचतन या जिल्हा मार्गावर कार्ले गावाजवळ १ किलोमीटर अंतरावर नदी ने पूररेषा ओलांडली आहे. याशिवाय बोर्लीपंचतन येथून मुंबईकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावर वाकड्या पुलानजीक नदी ने धोक्याची पातळी ओलांडली आहे. तसेच वाळवटी – आरावी मार्गावर पुरसदृश्य परिस्थितीमुळे वाहनांना नाईलाजाने परतावे लागले.

संपूर्ण श्रीवर्धन तालुक्याला समुद्रकिनाऱ्यांनी वेढले आहे. अशाने समुद्राला भरती व अतिवृष्टी झाल्यामुळे खाडीलगत गावामध्ये उधाणाचे पाणी शिरून अनेक गावांतील शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. नुकतीच केलेली लावणी वाहून जात आहे. दिघी विभागात या अतिवृष्टीमुळे महावितरण चे मोठे नुकसान झाले.

सोसाट्याचा वाऱ्यामुळे येथील विद्युत खांबांची पडझड झाल्याने दिघी परिसरातील अद्याप वीज पुरवठा खंडित आहे. शनिवार सायंकाळपासून सुरू असलेल्या पावसामुळे दिघी – वेळास मार्गावरील भरणे घाटातील रस्त्यावर दरड कोसळल्याने दिघी जाणाऱ्या घाटातून प्रवास धोकादायक बनला होता.

# युवासेनेचा जबरदस्त विजय, शाळेत घुसून दाखले परत घेतले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना महामारीत शिक्षणाचे वर्ग बंद असतानाही खारघर येथील विश्वज्योत इंटरनॅशनल शाळेने विद्यार्थ्यांना फि भरण्याचा तगादा लावला होता. तसेच फि साठी छळवणूक करून विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवून काहींना दाखले सुद्धा पाठविले होते. याविरुद्ध युवा सेनाप्रमुख ना.आदित्य ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली युवा सेनेचे सहसचिव रुपेश पाटील यांनी विद्यार्थी व पालकांच्या साथीने आवाज उठविला होता व ठिय्या आंदोलन छेडले होते. अखेरीस एक महिन्यानंतर शाळेने नमते घेवून विद्यार्थ्यांना पाठविलेले दाखले पुन्हा माघारी घेतल्याने हा मोठा विजय मानला जात आहे.

यावेळी थेट शाळेत ६ तास पालकांसोबत युवासेना सह सचिव रुपेश पाटील यांनी ठिय्या आंदोलन करून अनधिकृतपणे दिलेले दाखले जो पर्यत शाळा मागे घेत नाही तोह पर्यंत जाणार नाही अशा घोषणा देऊन शाळेत पालकांच्या सोबत ठिया मांडला. शाळेचे प्रशासन बिथरून दिवसभरात शाळेने रुपेश पाटील व पालक यांच्यासमवेत अनेक बैठका पार पाडल्या मात्र कोणत्याही अटी तटी शिवाय दाखले मागे घ्यावेत ह्या मागणीवर युवासेना ठाम राहिली व शेवटी खारघर येथील कोणाच्याही वेठीस न येणारी 'विश्वज्योत इंटरनॅशनल शाळा' अखेरीस नमली. व १ महिन्याच्या ठोस आंदोलनानंतर, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे, शिक्षण मंत्री सौ वर्षा गायकवाड, व अनेक शिक्षण अधिकाऱ्यांना सोबत घेऊन हे आंदोलन कोणत्याही अटी तटी शिवाय संपविण्यात आले. शाळेने ह्याधी युवासेनेच्या मध्यस्थीने शाळेने बंद केलेले गुगल क्लास व ऑनलाईन क्लास सुरू केले होते मात्र शाळेतून काढलेल्या दाखल्यावर युवासेनेने तीव्र आक्षेप घेतला होता आणि थेट शाळेत घुसून दाखले परत घेतले हा युवासेनेचा जबरदस्त विजय असून ह्यामुळे इतर शाळांना चपराक बसेल अशी भूमिका रुपेश पाटील यांनी घेतली आहे. युवासेनेचे सह सचिव रुपेश पाटील आणि मुख्याध्यापिका यांच्या हस्ते सर्व २८ पालकांना दाखले मागे घेतल्याचे पत्र देण्यात आले. ह्यावेळी शाळेचे वरिष्ठ प्रशासन, समाजसेवक ॲड अक्षय काशीद ,पत्रकार हर्षल भदाणे निकेश घरत उपस्थित होते.

फीचा तगादा लावून पालकांवर जुलूम करणाऱ्या शाळांना चपराक असून अशा शाळा जर पालकांना वेठीस लावत असतील तर रुपेश पाटील यांनी त्यांना संपर्क करण्याचे आव–ाहन केले आहे त्यांनी त्यांचा दूरध्वनी क्रमांक ९८२०७०७२०२ दिला आहे. काल पालकांचा विजय झाला असून हा विजय विद्यार्थ्यांच्या हक्काचा आहे आणि त्यामुळे आमदार अनेक स्थानिक पदाधिकारी असून देखील पालकांच्या सोबत युवासेना उभी राहिली म्हणून पालकांनी युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे, सचिव वरूण सरदेसाई व सह सचिव रुपेश पाटील यांचे आभार मानले.

# माथेरानमध्ये वर्षासहलीसाठी पर्यटक दाखल

**दै.रायगड नगरी । माथेरान**

पावसाळ्यातील आल्हाददायक गारवा अन लॉक डाऊन काळात घरात बसून मनाला आणि विचारांना आलेली उष्ण मरगळ दूर करण्यासाठी पर्यटकांनी माथेरान मध्ये एकच गर्दी केलेली दिसत असून इथे एकप्रकारे जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

निम्म्याहून अधिक एक दिवसीय पर्यटकांचा भरणा आल्याने इथल्या लॉज धारकांना त्याचप्रमाणे अश्वपाल, हातरीक्षा चालक, लहान मोठे स्टॉल धारक, रेस्टॉरंट, बार यांना चांगल्या प्रकारे उत्पन्न प्राप्त झालेले आहे.पर्यटकांनी बाजारपेठा फुल्ल झालेल्या आहेत तर हौशी पर्यटक घोडेस्वारी करीत आहेत,आबालवृद्ध मंडळी हातरीक्षा मधून विविध पॉईंट्स ची सैर करत आहेत. विशेष म्हणजे लाल मातीच्या रस्त्यावरून पायी चालत जाण्याची मजा काही औरच असते त्यामुळे अनेक पर्यटक चालण्याचा मनमुराद आनंद उपभोगत आहेत. पावसाचे प्रमाण काहीअंशी कमी असल्याने मुख्य रहदारीच्या असणाऱ्या महात्मा गांधी मार्गावर चालताना रस्ते अत्यंत चिखलमय झालेले आहेत. बाजारपेठ मध्ये खरेदी करताना चिखल तुडवत दुकानात जावे लागत आहे. तर या मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यावरून घोडे जात असल्याने मधोमध असणाऱ्या मातीच्या कच्च्या चिखलाच्या रस्त्यावरून पर्यटकांना प्रवास करावा लागत आहे.



अनेक ठिकाणी पावसाळी पाणी तुंबल्यामुळे पाय घसरून किरकोळ अपघात सुध्दा होत आहेत. याकामी निदान या मार्गावर नगरपरिषदेच्या मार्फत तात्पुरत्या स्वरूपात रस्त्याची मलमपट्टी करण्यात यावी जेणेकरून पायी चालणाऱ्या पर्यटकांना त्याचप्रमाणे नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागणार नाही अशी मागणी स्थानिकांसह व्यापारी वर्गाकडून केली जात आहे.

# आयुष गार्डन संकल्पना कौतुकास्पद : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । पेण**

आयुष गार्डन ही संकल्पना कौतुकास्पद आहे. रायगड जिल्ह्यात प्रथमच असे गार्डन होत आहे. असे कौतुकोद्गार पालकमंत्री आदीती तटकरे यांनी पेण उपजिल्हा रुग्णालयात आयुष गार्डन, पार्किंग व रुग्णवाहीका लोकार्पण सोहळ्यात मार्गदर्शन करताना काढले. पेण उपजिल्हा रुग्णालयाच्या आव–ारात आयुष गार्डन व पार्किंग व्यवस्था साकारण्यात आली असून त्याचा लोकार्पण सोहळा पालकमंत्री आदीती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते करण्यात आला. या गार्डनमध्ये कापूर, कडुलिंब, आवळा, कोरफड, गुळवेल, शतावरी, चंदन, , अर्जुन, काळीमिरी, पुदिना, सर्पगंधा, शमी, हळद, औदुंबर, बेल व इतर औषधी झाडे वृक्षमित्र उदय मानकवले यांच्या सहकार्याने लावण्यात आली. यावेळी भूषण कडू यांनी आजारी व्यक्तीला धनादेश देऊन मदत केली.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## युवतीला फसवणाऱ्या बंगाली बाबास अटक

गु.रजि. क्र. २३३/२०२१ भा.दं.वि. कलम ४२०,४१७,५०६,५०७ सह महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ठ आणि अघोरी कृत्यांना प्रतिबंध व निर्मुलन व काळा जादु नियम २०१३ कलम ३ अन्वये दि. ०१/०७/२०२१ रोजी गुन्हा नोंद केला होता. सदरचा गंभीर गुन्हा उघडकीस आणणेबाबत अपर पोलीस आयुक्त, गुन्हे डॉ. बी.जी.शेखर पाटील पोलीस उप आयुक्त, गुन्हे प्रवीण पाटील यांनी आदेशीत केले होते. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे विनोद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष ०२ चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक गिरिधर गोरे करीत असताना आरोपीचे वेगवेगळे गुगुल पे क्रमांक, बँक अकाउंट क्रमांक वं घधउ ची माहीती घेतली तसेच मोबाईल क्रमांक प्राप्त करुन सी.डी.आर. विश्लेषण केले. सदर आरोपीबाबत गुन्हे शाखा कक्ष–०२ चे पो.उप.निरी. वैभव रोंगे यांना मिळालेल्या माहीतीनुसार सदर आरोपी दि.११/०७/२०२१ रोजी गोविंदनगर, मिरा रोड, ठाणे येथे येणार असल्याची माहीती प्राप्त झाल्याने सदर ठिकाणी तात्काळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे पो.उप.नि. वैभव रोंगे, रूपेश पाटील, इंद्रजीत कानू, दीपक डोंगरे, आदिनाथ फुंदे यांनी आरोपी वसिम रईस खान उर्फ बाबा कबीर खान बंगाली वय ३३ वर्षे, रा. रुम नं. १०२, समर्थ अपार्टमेंट, गोविंदनगर, मिरा रोड मुळ रा. रुम नं. २२२, लिसाळी रोड, मेरठ सिटी, जिला– मेरठ, राज्य– उत्तर प्रदेश यास शिताफीने ताब्यात घेतले असता आरोपिने गुन्ह्याची कबुली दिली, तसेच आरोपीचे मोबाईलच्या गुगल पे अकाउंटवर पिडीत मुलीने पाठविलेल्या पैशांचा तपशिल देखील आहेत. सदरच्या गंभीर गुन्ह्यातील आरोपीस कधिही फिर्यादी यांनी प्रत्यक्षात पाहिलेले नसताना, तो कसा दिसतो याचेबाबत खात्री नसताना व वारंवार मोबाईल व राहाण्याचे ठिकाण बदलत असतांना देखील गुन्हे शाखा कक्ष ०२ चे पथकाने परिश्रम करुन आरोपिचे मोबाईल क्रमांक, बँक अकाउंट, बातमिदारांकडुन माहीती प्राप्त करुन कौशल्यपुर्ण तपास करून गंभीर गुन्हा उघडकीस आणेलला आहे.सदर आरोपीने अशा अनेक लोकांना फसवले असून आणखीन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. नमूद आरोपीने कोणास फसविले असल्यास त्यांनी गुन्हे शाखा व खारघर पोलीस ठाणे येथे संपर्क करण्याचे आवाहान करण्यात येत आहे.

## चिरनेरच्या अक्कादेवी धरणावर पर्यटकांचा धिंगाणा

नियम काहीसे शिथिल झाल्याचा फायदा घेत रविवारी या धरणावर पर्यटकांनी मोठी गर्दी केली होती. या ठिकाणी आलेल्या पर्यटकांनी आपल्या सोबत आणलेला खाऊ, दारूच्या बाटल्या, प्लास्टिक असेच या परिसरात अस्ताव्यस्त फेकून दिल्याने या ठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे.

या धरणाजवळच आदिवासी वस्ती आहे. येथे येणारे पर्यटक आपली वाहने अस्ताव्यस्त कुठेही रस्त्यात उभ्या करून ठेवत असल्यामुळे या आदिवासींचा रस्ताच रोखला जातो. त्याच प्रमाणे या परिसरात काही मद्यधुंद पर्यटक अर्धनग्न अवस्थेत पाण्यात डूंबत असल्याने येथिल आदिवासी महिलांना संकोच निर्माण होतो. दारूच्या बाटल्यांच्या काचा फोडून टाकल्यामुळे येथे खेळणाऱ्या, बागडणाऱ्या आदीवासी मुलांना अनेक वेळा गंभिर दुखापती देखिल झाल्या आहेत. चिरनेर ग्रामपंचायतीने येथे पर्यटकांना येण्यास बंदी घातली आहे. सुरूवातीला काही दिवस पोलिसांनी येथून पर्यटकांना पिटाळून लावले होते. मात्र या रविवारी कोणीही पोलिस येथे फिरकले नसल्यामुळे पर्यटकांनी येथे धिंगाणा घालून मोठ्या प्रमाणात घाण केली आहे. त्यामुळे यापुढे अक्कादेवी धरणावर अशा धिंगाणा घालणाऱ्या पर्यटकांना बंदी घालावी अशी मागणी येथिल आदिवासी बांधव करत आहेत.

## शेकाप शांत बसणार नाही : प्रितम म्हात्रे

आणले. आता तरी सत्ताधाऱ्यांनी जागे होऊन सर्वसामान्य नागरिकावर लावलेला अन्यायकारक मालमत्ता कर रद्द करून, दुहेरी कराच्या विरुद्ध योग्य निर्णय घ्यावा अशी अपेक्षा खांदा कॉलनी येथील रहिवासीयांच्या बैठकीत मा.उपनगराध्यक्ष गणेश पाटील यांनी व्यक्त केली. पनवेल महानगरपालिकेने सर्वप्रथम खांदा कॉलनी करांना योग्य त्या आरोग्य सेवा पुरवाव्यात जेणेकरून कोरोना चे रुग्ण वाढणार नाहीत त्यासाठी प्राधान्य द्यावे त्यानंतर इतर सुविधा पुरवाव्यात त्यानंतरच कर लावावा अशी अपेक्षा शेकाप नेते अनिल बंडगर यांनी व्यक्त केली.

यावेळी नगरसेविका सौ सारिका भगत , माजी नगरसेवक शिवाजी थोरवे, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक विकास मंडळाचे अध्यक्ष श्याम लगाडे , सचिव महेंद्र कांबळे ,शेकाप युवा नेते अतुल भगत ,मंगेश अपराज , शेकडो नागरिक आणि सोसायट्यांचे पदाधिकारी उपस्थित होते.


## ग्रामपंचायत वलप

ता.पनवेल, जि.रायगड

### जाहीर निविदा

दि.१२/०७/२०२१

ग्रामपंचायत वलप, ता.पनवेल, जि. रायगड हे १५ व्या वित्त आयोग सन २०२०–२०२१ अंतर्गत पुढील साहित्यांची/कामांची अंमलबजावणी करिता सिलबंद निविदा / कोटेशन मागवीत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कोटेशन |
|---|---|---|
| १ | राजिप शाळेमध्ये पाण्याची टाकी खरेदी करणे | कोटेशन |
| २ | राजिप शाळेमध्ये हॅण्डवॉश स्टेशन उभारणे | कोटेशन |
| ३ | राजिप शाळेमध्ये आरोग्य विषयक साहित्य पुरविणे (मास्क, सॅनिटायझर मशिन, सॅनिटायझर ५ लिटर) | कोटेशन |
| ४ | राजिप शाळेमध्ये नेट बील भरणे व नेट कनेक्शन देणे | कोटेशन |
| ५ | ग्रामपंचायत हद्दीतील मुलींना प्रायोगिक तत्वावर नॅपकिन वाटप करण्यासाठी खरेदी करणे, वेडींग मशिन खरेदी करणे | कोटेशन |
| ६ | ज्येष्ठ नागरिक आरोग्य तपासणी करणे व उपाय योजने संबंधी साहित्य खरेदी करणे | कोटेशन |
| ७ | आदिवासीवाडीतील बोअरवेलसाठी कठडा बांधणे | कोटेशन |
| ८ | ग्रामपंचायतीसाठी घंटागाडी खरेदी करणे (थ्री व्हीलर) | कोटेशन |
| ९ | फॉगिंग मशिन खरेदी करणे | कोटेशन |
| १० | अंगणवाडीसाठी कपाटे खरेदी करणे | कोटेशन |
| ११ | राजिप शाळेसाठी साहित्य खरेदी करणे | कोटेशन |

**अटी व शर्ती :–**

१.भरलेल्या सीलबंद निविद/कोटेशन दिनांक १३/०७/२०२१ ते १९/०७/२०२१ रोजी कार्यालयीन वेळेत संध्याकाळी पाच वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

२.आलेल्या निविदा दि. २०/०७/२०२१ रोजी सकाळी ११:०० वाजता उघडण्यात येतील.

३.मंजूर दुकानदारास वस्तू दिल्याशिवाय पैसे दिले जाणार नाहीत.

४.निविदा/कोटेशन पोष्टाने दिनांक १९/०७/२०२१ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यत ग्रामपंचायत कार्यालयामध्य पोहचतील त्यांचा विचार करण्यात येईल व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा /कोटेशन स्वीकारल्या जाणार नाहीत.

५.सदर जाहिरातीमधील अनुक्रमांक १ ते ११ नुसार मागविण्यात आलेल्या साहित्याचे, दुरुस्तीचे, उपसणे यांचे कोटेशन हे वर्षभरासाठी असेल.

६.नियमा प्रमाणे सर्व शासकीय भरणा करावा लागेल.

७.अधिकृत ठेकेदारांनी/दुकानदारांनी निविदा/कोटेशन न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केले जाईल.

८.कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, बिलातून कपात केली जाईल.

९.वर्क ऑर्डरप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून/दुकानदाराकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.

१०. निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.

११.निविदा/कोटेशन मंजूर केल्यास ४ दिवसांत काम सुरु करणे बंधनकारक आहे.

१२.निविदा/कोटेशन मंजूर केल्यावर रु.५००/– चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देऊन करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा लागेल.

१३.सुरक्षा अनामत रक्कम ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा/वस्तूचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.

१४.निविदा/कोटेशन धारका कडे पॅनकार्ड असणे आवश्यक आहे.

१५.अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची निविदा अस्वीकृत राहील.

१६.निविदा मंजूर केलेल्या प्रमाणे काम करण्यात यावे कोणाचेही तोंडी सांगण्यावरून वाढीव काम केल्यास वाढीव रक्कम दिली जाणार नाही.

१७.कमीत कमी दराची निविदा/कोटेशन मंजूर करण्याबाबत विचार करण्यात येईल.

१८.निविदा मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

**सही/–**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत वलप**

**सही/–**
**सरपंच**
**ग्रामपंचायत वलप**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# १५० कोटी खर्चाच्या करंजा मच्छिमार बंदरावर कमी उंचीच्या समस्येमुळे नवे संकट

## बंदराची उंची आणखी ५ फुटांनी वाढविण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

याआधीच मागील नऊ वर्षांपासून रखडत – रखडत सुरू असलेल्या १५० कोटी खर्चाच्या करंजा मच्छिमार बंदराचे कामात आता बंदराच्या उंचीचा प्रश्न निर्माण झाला आहे. बंदराची उंची कमी असल्याने समुद्राच्या भरतीच्या पाण्यामुळे मच्छिमार बोटींचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. यामुळे करंजा मच्छिमार बंदराची उंची आणखी पाच फुटांनी वाढविण्याची मागणी करंजा मच्छिमार सहकारी संस्थेने मत्स्यव्यवसाय व बंदर विकास मंत्री अस्लम शेख व खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे करण्यात आली आहे. पुर्णत्वाकडे वाटचाल करीत असलेल्या बंदराच्या कामात आता नवे संकट उभे ठाकले आहे. त्यामुळे करंजा मच्छिमार बंदराची साडेसाती तुर्तास तरी संपण्याची चिन्हे दिसत नाही.



मुंबई, रायगड, पालघर, ठाणे या तीन जिल्ह्यातील हजारो मच्छिमारांसाठी मुंबईतील ससुनडॉक हेच एकमेव बंदर उरले आहे. या चारही जिल्ह्यातील हजारो मच्छिमार बोटी ससुनडॉक बंदराच्या आश्रयाला येतात. खोल समुद्रात मासेमारीसाठी जाण्यापुर्वी ससुनडॉक बंदरातच डिझेल, बर्फ आणि इतर आवश्यक साधनसामुग्री बोटीत भरण्यात येते. मासेमारी करुन परतल्यानंतर याच बंदरात मासळी उतरवतात व लिलाव करुन मासळी विक्री करतात. ससुनडॉक बंदराची ७०० मासेमारी बोटी लागण्याची क्षमता आहे. मात्र अन्य पर्याय उपलब्ध नसल्याने वर्षोवर्ष हजारो मच्छिमार बोटी ससुनडॉक बंदरातच लॅड होतात. क्षमतेपेक्षा कितीतरी अधिक पटीने ससुनडॉक बंदरात मच्छिमार बोटी येत असल्याने मोठी गर्दी होते.

यामुळे बंदरावर मोठा ताण पडत असल्याने मच्छिमारांना अनेक समस्यांना सामोरे जाण्याची पाळी येते. त्यामुळे ससुनडॉक बंदरावरील वाढता ताण दूर करण्यासाठी आणि मुंबई, पालघर, ठाणे, रायगड जिल्ह्यातील मच्छिमारांना होणारा त्रास कमी करण्यासाठी रायगड जिल्ह्यातील करंजा खाडी किनारी एक हजार मच्छिमार बोटी लागण्याच्या क्षमतेचे अत्याधुनिक बंदर उभारण्यात येत आहे. २०१२ साली ६४ कोटी खर्चाच्या कामाला सुरुवात झाली होती. मात्र समुद्राच्या तळाशी अवघड खडक लागल्याने वाढत्या खर्चामुळे बंदराचे काम रखडले होते. खडक फोडून बंदर उभारणीसाठी अतिरिक्त वाढलेल्या खर्चामुळे बंदराचे काम ६४ कोटींवरुन १४९.८० कोटींपर्यंत पोहचले आहे.

अतिरिक्त वाढलेल्या खर्चाचा निधी शासनाकडून वेळेत उपलब्ध होऊ शकला नाही. त्यामुळे निधीअभावी अद्ययावत करंजा बंदराचे काम मागील नऊ वर्षांपासून रखडले होते. केंद्र आणि राज्य सरकारकडून निधी उपलब्ध झाल्यानंतर २०१८ मध्ये पुन्हा एकदा रखडलेल्या बंदराच्या कामाला सुरूवात झाली आहे. बंदराचे काम पूर्ण होत आले असल्याने बंदर लवकरच राज्यातील मच्छिमारांसाठी खुले करण्यात येण्याआधीच मच्छिमारांसमोर नव्याने बंदराच्या उंचीचे संकट उभे ठाकले आहे.

समुद्राच्या उधाणाच्या भरतीच्या पाण्यानंतरही करंजा बंदराच्या जेट्टीची उंची साधारणतः अडीच फूट अडीच फूट राहणे आवश्यक आहे. या घडीला मात्र समुद्राच्या उधाणाच्या भरतीनंतर जेट्टीची उंची दीड फुटांपर्यंतच राहात आहे. यामुळे भरतीमध्ये जेट्टीच्या कमी उंचीमुळे मच्छिमार बोटीने नुकसान होण्याची शक्यता अधिक आहे.

यासाठी करंजा मच्छिमार बंदराची उंची आणखी पाच फुटांनी वाढविण्याची मागणी मत्स्यव्यवसाय व बंदर विकास मंत्री अस्लम शेख व खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे करण्यात आली असल्याची माहिती करंजा मच्छिमार सहकारी संस्थेचे अध्यक्ष भालचंद्र कोळी यांनी दिली. तसेच बंदराच्या शेजारीच सुरू असलेली रो–रो जेट्टी आणि करंजा लॉजिस्टिक बंदराच्या उभारण्यासाठी सुमारे २०० एकर क्षेत्रावर मातीचा भराव करण्यात आला आहे. त्यामुळे समुद्राच्या भरतीच्या पाण्याची पातळी वाढली आहे. त्यामुळे जेट्टीची उंची आणखी कमी होणार असल्याची भिती भालचंद्र कोळी यांनी व्यक्त केली आहे.

# संक्षिप्त...

## महाराष्ट्र प्रांतिक तैलीक तालुकाध्यक्षपदी नवनियुक्त्या

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

कोकण विभाग महाराष्ट्र प्रांतिक तैलीक महासभेचे अध्यक्ष सतिश वैरागी पनवेल यांच्या मार्गदर्शनाने रायगड जिल्हा अध्यक्ष गणेश महाडीक यांच्या नेतृत्वात रविवार दिनांक ११ जुलै २०२१ रोजी माणगांव रायगड येथे खेळीमेळीच्या वातावरणात झालेल्या प्रांतिक तैलीक समाज बैठकीत सर्वानुमते माणगांव–तळा तालुक्यासाठी उतेखोलचे रविंद्र कुवेसकर तर म्हसळा–श्रीवर्धन तालुक्यासाठी वेळासचे रविंद्र निगडे तसेच महाड– पोलादपूर साठी बिरवाडीचे महाडचे किशोर किर्वे या तिघांची महाराष्ट्र प्रांतिक तैलीक संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी नवनियुक्त्या केल्याचे कोकण विभाग महाराष्ट्र प्रांतिक तैलीक संघटनेचे कार्याध्यक्ष गणेश मुरलीधर धोत्रे यांनी जाहिर केले.

उतेखोल येथिल कुवेसकर यांच्या निवासस्थानी झालेल्या या तेलीसमाज बांधवांच्या बैठकीस मुंबई येथुन महाराष्ट्र प्रांतिक तैलीक महासभेचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष गणेश मारुती महाडिक यांनी तेली समाजाचे संघटन रायगड मध्ये आणखी मजबुत करण्याच्या दृष्टीकोनातून विशेष मार्गदर्शन केले व सर्वांचे अभिनंदन केले आहे. यावेळी वेळास येथुन रविंद्र महादेव निगडे, पनवेल येथुन गणेश मुरलीधर धोत्रे, निजामपुर माणगांव येथुन संदिप शांताराम जाधव, बिरवाडी महाड येथुन किशोर दगडु किर्वे, राजेश भरत लांजेकर, माणगांवचे रमेश उखर्डू चौधरी, उदय नारायण चौधरी, संतोष बाळकृष्ण जाधव, विनोद चंद्रकांत सोनावणे, अजित चंद्रकांत तार्लेकर, रविंद्र मुकुंद कुवेसकर आदि मान्यवर उपस्थित होते. नवनियुक्त अध्यक्षांचे तालुक्यासह जिल्ह्यातील सर्व समाजबांधवाकडुन अभिनंदन होत आहे.



## हॉटेलसह ब्यूटी पार्लर, किराणा व मेडिकल स्टोरमध्ये अज्ञात चोरट्यांनी केली चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील तळोजा फेज–१ याठिकाणी असलेल्या हॉटेलसह ब्यूटी पार्लर, किराणा व मेडिकल स्टोर बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्यांनी केलेल्या चोरीत हजारोंचा ऐवज व रोखरक्कम लंपास केल्याची घटना घडली आहे. तळोजा फेज–१, से–१४, प्लॉट क्र.–१०० याठिकाणी असलेले ज्युबिलीयन कुक हॉटेल, मिस ब्यूटी पार्लर, हरिओम किराणा स्टोर तसेच स्वाती मेडिकल या दुकानांचे शटरचे कुलूप तसेच बाजूची कडी कोयंडा कशाने तरी तोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश करून रोखरक्कम व इतर सामान असा मिळून जवळपास १६ हजार ४०० रूपयांचा ऐवज चोरल्याची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## अखेर पाऊस बरसला आणि पर्यटक बहरला

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानमध्ये पर्यटनास परवानगी मिळाल्या नंतर पावसाने दडी मारली होती. त्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटकांमध्ये निराशा होती. पण आज सकाळपासून पुन्हा पावसाने हजेरी लावल्याने येथील वातावरणातील बदलाने निसर्गाबरोबर आलेले पर्यटक ही बहरले आहेत.

मागील काही वर्षांमध्ये पावसाळी पर्यटन हा नवा प्रकार तरुण पिढीमध्ये मोठ्या प्रमाणात पसरताना दिसत आहे. विकेंडला तर रायगड जिल्ह्यामध्ये सर्वत्र पर्यटक दिसून येत असतात. त्यातच काही उत्साही तरुणांमुळे अपघात ही होत असतात. त्यामुळेच जिल्ह्यातील धरणे व धबधब्यांवर पर्यटकांना बंदी जाहीर केलेली आहे. त्यामुळे माथेरान ला पावसाळी पर्यटन चांगलेच बहरते व विकेंड ला आगाऊ बुकिंग नसेल तर अनेकांची निराशाही होत आहे येथे फक्त पावसाचा आनंद घेण्यासाठी अनेक पर्यटक दाखल झालेले आहेत. पण पावसाने दडी मारल्याने सर्वांमध्ये निराशा जाणवत होती पण आज माथेरान मध्ये पावसाने पुन्हा हजेरी लावल्याने अनेक ठिकाणी पर्यटक भिजण्याचा आनंद घेताना नजरेस पडत होते तर पावसाअभावी येथील शारलेट लेक चा ओवरफ्लोचा धबधबा मंदावला होता तो आता पुन्हा जोमाने वाहू लागल्याने पर्यटकांची पावले पुन्हा त्याबाजुला वळली आहेत. तर आज दिवसभर येथे वारा व धुक्याचा लपाछपीच्या खेळाचा आनंद घेताना पर्यटक दिसत होते.



## थोड्याशा विश्रांतीनंतर पावसाची पुन्हा दमदार सुरुवात

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

मागील पंधरा दिवसापासून दडी मारलेल्या पावसाने अखेर पुन्हा धो धो बरसायला सुरूवात करून दमदार स्वरूपात बरसायला लागल्याने शेतकरी वर्ग समाधानी झालेला दिसत आहे.

मागील पंधरा दिवसांत तुरळक स्वरूपात बरसाणाऱ्या पावसाने गेल्या चार दिवसांपासून चांगली सुरुवात करून दमदार स्वरूपात बरसत असल्याने शेतकरी वर्ग सुखावला असून त्याने आपल्या खोळंबलेल्या लावणीच्या कामास प्रारंभ केला असल्याचे दिसून येत आहे. पावसाअभावी भातशेतीचे क्षेत्रात पाणीच नसल्याने भात लावणीची कामे खोळंबली होती.त्यातच भात लागवड करताना शेती क्षेत्रात चांगले चिखळ होणे आवश्यक असते. परंतु पाऊस थांबला असल्याने लावणी व चिखळणीची कामे थांबली होती. सद्यस्थितीत पावसाने दमदार सुरुवात केल्याने भात लावणीचे कामांनीही चांगला वेग घेतला असल्याचे दिसून येत आहे. पावसाच्या भरवश्यावर भातशेतीची स्थिती अवलंबून असल्याने कधी अतिवृष्टी तर कधी सुका दुष्काळ या ससेमिरित शेतकरी वर्ग कायमच सापडला आहे. त्यातच दिवसेदिवस वाढत जाणारी महागाई यामुळेही शेती करणे परवडत नसल्याने केवल आपल्या हक्काची भाकरी व रोजंदारीचे साधन म्हणून बरेच शेतकरी शेती करणे परवडत नसतानाही शेती करताना दिसत आहेत.

## रस्ते विकास कामांचा शुभारंभ व वृक्षारोपण

**दै.रायगड नगरी । पेण**

रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने पेण तालुक्यातील डोलवी ग्रामपंचायतीच्या अंतर्गत येणाऱ्या रस्ते, वृक्षारोपण आदी कामांचा शुभारंभ सरपंच वनिता अनिल म्हात्रे, उपसरपंच सविता जांभळे तसेच सामाजिक कार्यकर्ते अनिल म्हात्रे व रामचैतन्य महाराज ह्यांचे प्रमुख उपस्थितीत झाला.

यावेळी सदस्य परशुराम म्हात्रे, बजरंग पाटील, सुनीता म्हात्रे, कल्पना माळी, अजय पाटील, भारत पवार, सुनीता पाटील, व अनंत पाटील, हिराजी पाटील, चंद्रकांत म्हात्रे, किशोर म्हात्रे, जगन्नाथ पाटील, माजी सरपंच जनाबाई पवार, रोहन म्हात्रे आदी उपस्थित होते.

या रस्त्याचे सर्व श्रेय जगन्नाथ पाटील व अनिल म्हात्रे व माझ्या सर्व सहकाऱ्यांना जातोय. आज ह्या रस्त्यामुळे आदिवासी बांधवांना वाडीवर जाण्यासाठी दुचाकी व चारचाकीने जाता येईल. व अभयराम सन्यास आश्रमाकडे जाण्याच्या रस्त्यामुळे आश्रमात जाण्याचा मार्ग सुखकर होणार आहे. असे डोलवी ग्रामपंचायतीच्या सरपंच वनिता अनिल म्हात्रे यांनी सांगितले. याचवेळी ग्रामपंचायतीच्या विविध ठिकाणी वृक्षारोपण ही करण्यात आले.

## माथेरानच्या समस्या नक्कीच सोडविण्यासाठी प्रयत्न करणार : शामसुंदर शिंदे

**दै.रायगड नगरी । माथेरान**

रायगडचे माजी जिल्हाधिकारी व शेकापचे कंधार लोहा येथील विद्यमान आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी आज माथेरानला भेट दिली व येथील रोप वे व्यवस्था व मालवाहतूक व्यवस्था यांचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासन दिले आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये २००२ ते २००५ ह्या काळामध्ये रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहिलेले श्यामसुंदर शिंदेच्या कार्यकाळात माथेरानला विशेष प्राधान्य देताना येथील अनेक समस्या सोडविल्या होत्या ते काल माथेरानमध्ये आपल्या कुटुंबासोबत आले होते सध्या प्रशासकीय सेवेतून निवृत्त झाले असले तरी ते सध्या शेतकरी कामगार पक्षाचे एकमेव आमदार म्हणून नांदेड येथील कंधार लोहा मतदार संघाचे आमदार म्हणून प्रतिनिधित्व करतात आपल्या कार्यकाळात माथेरानमधील समस्यांची त्यांना जाण होती व आताही येथील वाहतूक व मालवाहतूक व्यवस्था तशीच असल्याने त्या सोडविण्यासाठी माथेरान करांना पूर्ण सहकार्य करू असे आश्वासन दिले तर माथेरानच्या नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी माथेरानच्या रोप वे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांना निवेदन दिले ह्यावेळी माथेरानचे माजी नगराध्यक्ष अजय सावंत,विवेक चौधरी, व गटनेते प्रसाद सावंत उपस्थित होते.

## केवाळे गावातील शेकापच्या कार्यकर्त्यांचा व महिलांचा शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पक्षप्रमुख व राज्याचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवसेना प्रमुख राज्याचे पर्यावरण व पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या कार्यप्रणाली वर विश्वास ठेवून पनवेल ग्रामीण मधील केवाळे गावातील शेकाप कार्यकर्त्यांसह महिलांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

तसेच यावेळी रायगड जिल्हा संपर्क संघटीका व मुंबईच्या महापौर सौ. किशोरीताई पेडणेकर व रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली सौ. अनीता डांगरकर यांची शिवसेना महिला आघाडी पनवेल ग्रामीण तालुका संघटिका पदी नियुक्ती करण्यात आली. याच दरम्यान पनवेल ग्रामीण केवाळे गावातील शेतकरी कामगार पक्षाचे माजी सरपंच नागेश पारवे व शे.का.प कार्यकर्ते राजेश पाटील यांच्या सह शेकडो पुरुष व महिलांनी शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश केला. त्या प्रसंगी शिवसेना उपमहानगर प्रमुख दिपक घरत, महिला आघडीच्या विधानसभा संघटिका सौ. रेवती सकपाळ, महानगर संघटिका सौ.अँड. शुभांगी शेलार व मंदा जंगले आदी शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


श्री.भाकरे सा़ो.कोर्ट

अर्जदारचे वकील श्री.शैलेश डी. नाईक

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.७९४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२६/०८/२१

१) श्रीमती.विमल दामु हेमाडे
वय : ५८ वर्षे, धंदा : घरकाम
२) श्री.अतिश दामु हेमाडे
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.मयुर दामु हेमाडे
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
४) श्री.संकेत दामु हेमाडे
वय : २२ वर्षे, धंदा : शिक्षण
सर्व रा.बी.२०५, इंद्र आंगण सोसायटी,
प्लॉट नं.०२, सेक्टर ९, खांदा कॉलनी,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, श्री.दामु रामु हेमाडे हे दि.०७/१०/२०२० रोजी मयत झाले असून, त्यांना अर्जदार क्र.१ ही विधवा पत्नी, अर्जदार क्र.२ ते ४ हे मुलगे, असे वारसदार आहेत.

**ना.कोर्टाच्या स्थळसिमेंत व अधिकार क्षेत्रात मौजे : खांदा कॉलनी, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील, सेक्टर नं.९ मधील, प्लॉट नं.२ वर बांधण्यात आलेल्या, इंद्र आंगण को.ऑ.हौ.सोसायटीच्या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील, फ्लॅट क्र.२०५, ज्याचे क्षेत्र ३७.८८७ चौ.मी. कारपेट क्षेत्र (४५.४६४ चौ.मी.बिल्टअप क्षेत्र) आहे. अशा वर्णनाची सदनिकेची मिळकत आहे.**

वरील वर्णनाची मिळकत, श्री.दामु रामु हेमाडे यांचे मालकी हक्कातील, ताबेकब्जातील व वापरातील होती. सबब, सदर मिळकतीचे ते एकमेव मालक होते. या मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

सबब, अर्जदार क्र.१ ते ४ हे श्री.दामु रामु हेमाडे यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून, अगर वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर करावयात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१२/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्याया, पनवेल**



राव साहेब

अर्जदारातर्फे वकील प्रशांत अशोक भुजबळ

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.६८३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०८/२१

१) श्रीमती.अनिता नामदेव पाटील
वय : ३७ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.अनुराग नामदेव पाटील
वय : १७ वर्षे, धंदा : शिक्षण
तर्फे अ.पा.क.आई
श्रीमती.अनिता नामदेव पाटील
रा.मु.कोल्ही कोपर, पो.पारगाव,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
३) श्रीमती.सुशिला एकनाथ पाटील
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रांजणपाडा, जासई, ता.उरण, जि.रायगड
४) श्रीमती.रुक्मिणी निवृत्ती गायकवाड
वय : ७१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड
५) श्रीमती.गुलाब बाळकृष्ण ठाकूर
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.धुतूम, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. गंगाबाई गंगाराम पाटील यांचे निधन दि.२४/०८/२०२० रोजी झालेले आहे. तसेच कै.गंगाबाई गंगाराम पाटील यांचे पती कै.गंगाराम सिताराम पाटील यांचे निधन दि.०२/०८/१९७२ रोजी झालेले आहे. त्याचप्रमाणे कै. गंगाबाई गंगाराम पाटील यांचा मुलगा कै.नामदेव गंगाराम पाटील यांचे निधन दि.०८/०३/२००४ रोजी झालेले आहे. श्रीमती.अनिता नामदेव पाटील वगैरे ह्यांनी कै.गंगाबाई गंगाराम पाटील यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मौजे : कोपर, ता.पनवेल, जि.रायगड**

| सांकेतिक क्र. | बांधकाम क्र. | बांधकामाचा वापर | बांधकामाचे क्षेत्र |
|---|---|---|---|
| KOP-ICIG-40 | KP-94 | निवासी | ७३.७८ चौ.मी. |

वरील संपादीत मिळकतीपोटी पुनर्वसन व पुर्नस्थापना योजनेंतर्गत सिडकोकडून कै.गंगाबाई गंगाराम पाटील यांना मौजे : पुष्पक/वडघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड नं.३१, सेक्टर नं.आर–५, क्षेत्र २३० चौ.मी. हा भूखंड दि.०३/०१/२०१८ रोजीच्या भाडेपट्टा कराराने वितरित करण्यात आलेला आहे. श्रीमती.अनिता नामदेव पाटील वगैरे हे कै.गंगाबाई गंगाराम पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत, ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्रीमती.अनिता नामदेव पाटील वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.गंगाबाई गंगाराम पाटील यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१२/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.राव साहेब

अ‍ॅड.अनिल जाधव

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.६७३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०८/२१

१) श्रीमती.रजनी मनसुखलाल दोषी
वय : ८७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.सदनिका नं.१, साधना,
बी–रोड, चर्चगेट, मुंबई ४०००२३
२) सौ.हिना राम भार्गव
वय : ५९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.५–५२, पाचवा मजला, साधना,
बी–रोड, चर्चगेट, मुंबई ४०००२३
अर्जदार नं.२ स्वतःकरिता व अर्जदार नं.१
यांचे कुलमुखत्यारी — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

१) सदरहू अर्जदार वर नमूद पत्यावर राहतात. वर नमूद अर्जदार हे कै.मनसुखलाल चुन्नीलाल दोषी यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.मनसुखलाल चुन्नीलाल दोषी यांचे निधन दि.२१/९/१९९७ रोजी त्यांचे राहते घरी मुंबई येथे झाले. अर्जदार क्र.१ व २ हे कै.मनसुखलाल चुन्नीलाल दोषी यांचे अनुक्रमे पत्नी व मुलगी आहे.

२) कै.मनसुखलाल चुन्नीलाल दोषी यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची मिळकत शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत**

| अनु क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | २९४ | ६ अ | ०–११–० | ०–२५ |
| २ | २९४ | ५ | ०–०५–० | ०–०९ |
| ३ | ३२७ | १ अ | ०–०–५ | ०–०१ |
| ४ | ३२७ | २ अ | ०–१७–० पो.ख.०–२–० | ०–५० |
| ५ | ३२७ | १३ अ | ०–१२–० पो.ख.०–१–० | ००–२८ |
| ६ | ३२७ | १२ | १–१४–० पो.ख.०–६–० | २–८२ |
| ७ | ३२७ | १० अ | ०–९२–० पो.ख.०–१५–० | १–८७ |
| ८ | ३२७ | ९ अ | ०–६६–० पो.ख.०–१५–० | १–२५ |
| ९ | ३२७ | ८ अ | ०–७०–० पो.ख.०–१७–० | १–४४ |
| १० | ३२७ | ६ अ | ०–५९–० पो.ख.०–१४–० | १–१२ |
| ११ | ३२७ | ५ अ | ०–६०–० पो.ख.०–१५–० | १–०७ |
| १२ | २८५ | १अ/१अ | ०–०४–० पो.ख.०–०१–० | ०–२२ |
| १३ | २८५ | १अ/१ड | ०–०३–० | ०–१९ |

सदरहू अर्जदार सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसच्या तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि या नोटीसीवरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत कै.मनसुखलाल चुन्नीलाल दोषी यांचे कायदेशीर वारसाचे सर्टीफिकेट देईल.

आज दि.१२ माहे ०७ सन २०२१

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## कोनजवळ झालेल्या अपघातात १ ठार १ जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील कोन गावाच्या हद्दीत उभ्या कंटेनरला ओमनी गाडीची धडक बसल्याने झालेल्या अपघातात १ ठार तर १ जखमी झाल्याची घटना घडली आहे.

कोन गावाच्या हद्दीत एक कंटेनर उभा असताना भरधाव वेगाने पुणे बाजूकडून येणाऱ्या ओमनी गाडीने धडक दिल्याने झालेल्या अपघातात ओमनी गाडीतील एक महिला गंभीररित्या जखमी होवून मयत झाली आहे. तर एक इसम जखमी झाला आहे. या अपघातात ओमनी गाडीचे मोठे नुकसान झाले आहे.

## खारघर परिसरात आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर वसाहत परिसरात एकाचा इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध खारघर पोलीस करीत आहेत.

सदर इसमाचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे असून रंगाने सावळा, उंची ५ फूट ५ इंच, अंगाने सडपातळ, दाढी वाढलेली, केस वाढलेले, समोर टक्कल, चेहरा संपूर्ण लालसर व नग्न अवस्थेत आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास खारघर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र बेलदार यांच्याशी संपर्क साधावा.

## पाणदिवे येथील दत्त मंदिरातील रक्तदान शिबीर रक्तदात्यांचा प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । उरण**

राज्यात रक्त व प्लाज्माची असलेली कमतरता लक्षात घेता गोरगरिबांना वेळेत रक्त व प्लाज्मा उपलब्ध व्हावे, रक्त व प्लाज्मा अभावी रुग्णांचे मृत्यू होऊ नये, या दृष्टी कोणातून उरण तालुक्यातील दत्त मंदिर सभामंडप, पाणदिवे येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्याच्या वतीने संस्थेच्या संकल्पनेतून, समर्पण ब्लड बँक घाटकोपर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराला युवकांचा, नवतरुणांचा उत्तम प्रतिसाद मिळाला असून एकूण ६५ रक्तदात्यांनी या शिबिरात रक्तदान केले.

सदर कार्यक्रम प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते अमित पाटील, प्रशांत ठाकूर, बांधपाडा ग्रामपंचायतीच्या उपसरपंच सुजित म्हात्रे, कोप्रोली ग्रामपंचायतचे विद्यमान सदस्य सदस्या शुभांगी म्हात्रे, सदस्य नंदन म्हात्रे, दत्त मंदिर व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष रमेश पाटील, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष हरिश्चंद्र खारकर, सामाजिक कार्यकर्ते शशी पाटील, छावा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुभाष कडू, जिव्हाळा फॉउंडेशनचे अध्यक्ष रुपेश पाटील, पंकज ठाकूर, शिक्षक सुधीर मुंबईकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर शिबीर यशस्वी करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सुनिल वर्तक, समर्पण ब्लड बँक घाटकोपर तसेच श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. विशेष बाब म्हणजे संस्थेचे सदस्य प्रेम म्हात्रे, हेमंत म्हात्रे यांचा यावेळी वाढदिवस होता. या शिवभक्तांनी रक्तदान करून आपला वाढदिवस समाजोपयोगी कार्यक्रमाने साजरा केला. संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील यांच्यासह संस्थेच्या पदाधिकारी व सदस्यांनीही यावेळी रक्तदान केले.

# माथेरानमध्ये भाजप, काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे शिलेदार शिवसेनेत डेरेदाखल

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नगरपरिषदेत एकहाती सत्ता स्थापन असलेल्या शिवसेनेवर निस्सीम प्रेम असणाऱ्या सदस्यांना आपल्याकडे वळविण्यात काँग्रेस पक्षाने शर्थीचे प्रयत्न केले होते. परंतु शिवसेनेच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून पुन्हा एकदा आपल्या गोटात ही मंडळी समाविष्ट झाली आहेत.

यामध्ये नुकताच काँग्रेस पक्षात प्रवेश केलेले चर्मकार समाजाचे माजी खजिनदार सचिन विलास काळे यांनी शिवसेनेची वाट धरली आहे. तर भाजपचे भारतीय जनता पक्ष, सेल अध्यक्ष माथेरान शहर तथा संत रोहिदास युवा महासंघ संपूर्ण भारत, कर्जत तालुका अध्यक्ष अक्षय सोनवणे आणि काजल अक्षय सोनवणे हे पतीपत्नी सुध्दा शिवसेनेत स्वेच्छेने दाखल झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे चर्मकार समाजाचे माजी सह खजिनदार सुभाष काळे आणि महेश काळे या शिलेदारांनी सुध्दा शिवसेनेत स्वेच्छेने प्रवेश केला आहे आहे.त्यामुळे माथेरानच्या युवा कार्यकर्त्यांची आजही शिवसेनेलाच पसंती




असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. शिवसंपर्क अभियानाची माथेरानमध्ये पक्ष प्रवेशाने धडाक्यात सुरुवात झालेली दिसून येत आहे.

आगामी निवडणुकीचे सर्वच पक्षांनी रणशिंग फुंकलेले सध्या सर्वत्र पहावयास मिळत आहे या सर्व नवोदित कार्यकर्त्यांनी शिवसेनेच्या कार्यप्रणाली वर विश्वास ठेवून शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी, संपर्क प्रमुख, गटनेते प्रसाद भाई सावंत, माजी नगराध्यक्ष विवेक चौधरी, आणि तमाम शिवसैनिक महिला आघाडी यांच्या साक्षीने या अभियानाच्या शुभ मुहूर्तावर पक्षप्रवेश करून शिवसेनेची आगामी निवडणुकीची ताकद आणखीन बळकट झालेली दिसत आहे. संत रोहिदास नगर हा भाग पूर्वीपासून राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून परिचित होता परंतु २०१६ च्या निवडणुकीत प्रसाद सावंत यांच्या राजकीय डावपेचांचा परिणाम झाल्याने हा भाग शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून उदयास आला आहे. शिवसंपर्क अभियानाचा छोटेखानी कार्यक्रम प्रसादभाई जनसंपर्क कार्यालयात मोठया दिमाखात पार पडला असंख्य कार्यकर्ते शासनाच्या नियमांचे पालन करून या ठिकाणी सहभागी झाले होते. यावेळी महिला आघाडीची उपस्थिती लक्षणीय होती. आगामी निवडणूक सुध्दा अगदी सहजपणे केवळ निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या आणि सुज्ञ मतदारांच्या सहकार्याने जिंकता येणार आहे.पुन्हा एकदा नगरपरिषदेवर भगवा झेंडा फडकविला जाईल असा ठाम विश्वास उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. केवळ साडेचार वर्षात न भूतो न भविष्यती अशाप्रकारे कामे मार्गी लागत आहेत. दस्तुरी पासून ते ऑलिंपिया मैदान आणि संत रोहिदास नगर ते रग्बी विभाग असो की अन्य ठिकाणी प्रत्येक प्रभागात विकासाची गंगा ही केवळ शिवसेनेच्याच कार्यकाळात आणली गेली आहे. सर्वसामान्य लोकांना उद्भवणाऱ्या अडीअडचणी सोडविण्यासाठी नेहमीच शिवसेना अग्रेसर असते. राज्याचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांचे लक्ष माथेरान वर असून त्यांच्या कार्यकाळात भरीव निधी माथेरान साठी देत आहेत त्यामुळे अनेक विकास कामे पूर्णत्वास आली आहेत असे संपर्क प्रमुख प्रसाद सावंत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर माजी नगरसेवक प्रकाश सुतार, जेष्ठ शिवसैनिक ज्ञानेश्वर बागडे, योगेश जाधव, वसंत कदम, मयुरेश कदम, महिला आघाडी संघटक संगीता जांभळे, मीरा फाउंडेशन उपाध्यक्षा रेखा चौधरी, अवधूत येरफुले, यांसह अनेकांनी आपले अनमोल विचार यावेळी व्यक्त केले.

> शिवसेनेने आजवरच्या कार्यकाळात अनेक विकास कामे खऱ्या अर्थाने पूर्ण केलेली आहेत त्यांच्या सोबत राहून नक्कीच या गावाच्या विकासासाठी काम करण्याची संधी उपलब्ध होऊ शकते. आमच्या प्रभागात काही कामे करण्यासाठी प्रयत्न केल्यास एक ते दोन व्यक्तींशिवाय अन्य कुणीही येत नाही. म्हणून मी व माझ्या पत्नीने शिवसेनेचे सदस्यत्व स्वेच्छेने स्वीकारले आहे.
>
> **अक्षय सोनावणे -माजी सदस्य भारतीय जनता पक्ष, माथेरान**

> शिवसेना ही खरोखरच उत्तम प्रकारे कामे करत आहे आणि ह्या गावाला विकासाकडे नेण्यासाठी या पक्षशिवाय अन्य काही पर्याय उपलब्ध नाही त्यामुळे मी प्रभावित होऊन आजच्या शिव संपर्क अभियानांतर्गत आनंदाने प्रवेश केला आहे.
>
> **सचिन विलास काळे -माजी सदस्य काँग्रेस**

> माझा जन्म माथेरानचा असल्याने मी अगदी जवळून अनेक नगरसेवक, नगराध्यक्ष पाहिले आहेत परंतु शिवसेना हा एक असा पक्ष आहे की तो सर्वसामान्य लोकांना न्याय देण्याचा पुरेपूर प्रयत्न करत आहे. त्यामुळे मला वाटले की खरोखरच ह्या पक्षात काहीतरी नवीन आहे म्हणून मी या पक्षात आलो आहे.
>
> **सुभाष काळे-सदस्य राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष माथेरान**

# उरणच्या प्रवेशद्वाराजवळ खड्ड्यांचे साम्राज्य

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

उरण शहरातील रस्ते काँक्रीटचे झाल्याने ते चकचकीत आहेत. मात्र उरण शहराच्या प्रवेशद्वाराची हद्द वादाच्या भोवऱ्यात अडकल्याने या प्रवेशद्वारावरील रस्ता पार उध्वस्त झाला असून तेथे खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. या खड्ड्यांमुळे उरण शहरात प्रवेश करताना वाहन चालकांना कसरत करावी लागत आहे.

उरण शहर हे ग्रामिण भागातील जनतेची बाजारपेठ आहे. दररोज शेकडो वाहने उरण शहरात येत असतात.नेहमी अत्यंत गजबजलेल्या या शहरातील रस्ते दोन वर्षांपूर्वीच सिमेंट काँक्रेटचे करण्यात आले आहेत. शहरातील रस्ते चकाचक झाले असले तरी उरण शहराच्या प्रवेशद्वारावर भलेमोठे चिखलमय खड्डे शहरात येणाऱ्यांचे स्वागत करीत आहेत. उरण शहराची चारफाटा व कोटनाका ही प्रवेशद्वारे चाणजे ग्रामपंचायतीच्या हद्दीत असल्याने उरण नगर पालिका येथील रस्ते करण्यास नेहमी



हात वर करते तर चाणजे ग्रामपंचायत सिडको हद्दीत असल्याने चारफाटा व कोटनाका येथिल रस्ते सिडकोने करावेत अशी अपेक्षा धरते. त्याच बरोबर हे रस्ते किंवा तेथे पडलेल्या खड्ड्यांच्या दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम खात्याने लक्ष घालण्याची मागणी जनतेतून होत आहे.

चारफाटा व कोटनाका ही प्रवेशद्वारे उरण नगर पालिका, सिडको, चाणजे ग्रामपंचायत व सार्वजनिक बांधकाम विभाग यापैकी कोणाच्या हद्दीत आहेत हे स्पष्ट होत नसल्याने गेली अनेकवर्षे या प्रवेशद्वारांवरील खड्डे सामान्य जनतेला व वाहन चालकांना डोकेदुखी होऊन बसले आहेत. त्यामुळे उरणच्या प्रवेशद्वारांवरील खड्ड्यांतून कधी सुटका होते याकडे जनता डोळे लावून बसली आहे.

## अभिनेता अंशुमन मल्होत्राचे सुधागड किल्ल्यावर आक्षेपार्ह कृत्य, बा रायगड संस्थेची कारवाईची मागणी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

कोरोनाचे निर्बंध असतानाही अभिनेता अंशुमन मल्होत्रा याने सर्व निर्बंध तोडत सुधागड किल्ल्यावर वाढदिवस साजरा केल्याचा प्रकार घडला आहे. एवढेच नाहीतर इथे त्याने आपल्या मैत्रिणीसोबतचे आक्षेपार्ह्य स्थितीमधील फोटो सोशल मीडियावर अपलोडही केले. याला बा रायगड संस्थेच्या कार्यकर्त्यांनी आक्षेप घेतला आहे. पोलीस आणि वनविभागाने यावर कारवाई करावी अशी मागणीही केली आहे. आपला वाढदिवस साजरा करण्यासाठी अंशुमन मल्होत्रा त्याच्या मित्र मैत्रिणीसोबत किल्ले सुधागडवर आला होता. पण तिथे त्याने गैरवर्तन केल्याचा प्रकार घडला आहे.

स्वराज्यासाठी ज्या किल्ल्यांवर आमच्या बापजाद्यांनी रक्त सांडलं, स्वराज्य उभारण्यासाठी रक्ताचा अभिषेक घातला. तेथे जर अशा घटना घडत असतील तर संबंधित व्यक्तींवर कारवाई व्हावी अशी मागणी 'बा रायगड परिवार' या संस्थेने पाली तहसिलदार व पाली पोलिसांकडे केली आहे. गड व किल्ल्याचे पावित्र्य राखण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे, येथे काही अश्लील प्रकार होत असतील तर याद राखा, या ठिकाणी कुणी आक्षेपार्ह कृत्य केल्यास त्याची हयगय केली जाणार नाही असा इशारा शिवप्रेमींनी दिलाय. दरम्यान हे क्षेत्र अभयारण्य घोषित केले असल्याने वनविभागाने किल्ल्यावर पर्यटकांना येण्यास बंदी घातली आहे. तरीही हे लोक किल्ल्यावर कसे आले असा सवालही उपस्थित होत आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कामाला लागा : आ.महेंद्र दळवी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांसाठी युती आघाडी होईल किंवा नाही याची वाट न पाहता कार्यकर्त्यांनी स्वबळावर निवडणुक लढण्यासाठी तयार राहण्याचा नारा जिल्ह्यातील शिवसैनिकांच्या कानात फुंकण्यात आला आहे. यासाठी आतापासूनच कामाला लागा आणि त्यासाठी सरकारची कामे लोकांपर्यंत पोहोचवा, असा संदेश शिवसेनेचे जिल्हा प्रमुख आ. महेंद्र दळवी यांनी दिला आहे. अलिबाग शिवसेना प्रमुख राजा केणी यांच्या पुढाकाराने अलिबाग येथे शिवसेना रायगड जिल्हा कार्यकारिणी सभा घेण्यात आली, त्यावेळी आगामी निवडणुकांसाठी ही रणनीती आखण्यात आली.

शिवसेना पक्षप्रमुख आणि मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी सेनाभवन येथे घेतलेल्या जिल्हाप्रमुखांच्या बैठकीत स्वबळाचा नारा दिला. त्यानंतर शिवसेना रायगड जिल्हा कार्यकारीणीची बैठक अलिबाग येथे पार पडली. या बैठकीत ११ ते २४ जुलै दरम्यान राबविण्यात येणाऱ्या शिवसंपर्क अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. शिवसैनिक पदाधिकाऱ्यांना याची माहिती देण्यातत आली. जिल्हाप्रमुख महेंद्र दळवी आणि संपर्कप्रमुख विलास चावरी यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. ज्या ज्या वेळी शिवसेनेने स्वबळावर निवडणुका लढलेल्या आहेत, तेव्हा चांगले मताधिक्य मिळाले असल्याचा विश्वास या नेत्यांनी कार्यकर्त्यांना दिला. यावेळी आ. महेंद्र दळवी यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, राज्यातील सत्तेत आहोत आपण असलो तरी गाफील




राहून चालणार नाही. पक्ष संघटना मजबूत करण्यांवर भर द्या. शिवसेनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे झालेली आहेत, सत्तेच्याव माध्येमातून केलेली विकासकामे लोकांपर्यंत पोहाचवा. मतदारांशी संपर्क वाढवून त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवा, यातून शिवसेना अधिक बळकट होईल. सध्याही शिवसेनेचे तीन आमदार जिल्ह्यात आहेत, सर्वाधिक मतदार शिवसेनेचे आहेत, जिल्हापरिषदेत सत्ता मिळविण्याचे सामर्थ शिवसैनिकांमध्ये आहे, ते वेळीच जाणून आतापासूनच कामाला लागण्याचे आवाहन जिल्हानप्रमुख महेंद्र दळवी यांनी केले. पक्ष संघटना वाढीसाठी राज्यलभर शिवसंपर्क अभियान राबवण्यात येत आहे. या माध्यूमातून लोकापर्यंत पोहोचण्यारची संधी आहे ती सोडू नका आणि जिल्हायातील स्थावनिक स्वनराज्य संस्थांवर भगवा फडकवण्याासाठी सज्ञस व्हा. असे दळवी यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना सांगितले. आगामी काळात नगरपालिका, पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणूका येवू घातल्या आहेत. त्यात स्वसबळावर जिंकण्यीच्या दृष्टीने कामाला लागा, असेही त्यांआनी सांगितले. संपर्कप्रमुख विलास चावरी यांनीही शिवसैनिक पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.

जिल्हा परिषदेत सत्तेत येण्यासाठी सर्व अनकुल परिस्थिती आहे. यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी संघटीतपणे कामाला लागण्याची गरज अलिबाग तालुका शिवसेना प्रमुख राजा केणी यांच्या संकल्पनेतून ११ ते २४ जुलै रोजी सुरू करण्यात आलेल्या शिवसंपर्क अभियानात डिजिटल व्हॅनचे उदघाटन करून सदर डिजिटल व्हॅन द्यारे शासनाच्या विकासकामांची माहीती जनतेपर्यंत पोचवणार. यावेळी शिवसेना सहसंपर्कप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, महिला संघटिका दिपश्री पोटफोडे, कामगार नेते दीपक रानवडे, युवासेनेचे सुधीर ढाणे, पेण उपजिल्हातप्रमुख नरेश गावंड, अलिबाग तालुका प्रमुख राजा केणी, पेण तालुकाप्रमुख अविनाश म्हात्रे, मुरूड तालुकाप्रमुख ऋषिकांत डोंगरीकर यांच्यानसह सर्व उपजिल्हानप्रमुख, उपतालुकाप्रमुख, विभागप्रमुख, उपविभागप्रमुख उपस्थित होते.

# ना.आदिती तटकरे यांच्या हस्ते खावटी योजनेंतर्गत अन्नधान्य वस्तू किट वाटप

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित नाशिक प्रादेशिक कार्यालय जव्हार व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय रायगड, पेण यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील अनुसुचित जमाती मधील कुटुंबाना सहाय्य करण्यासाठी खावटी योजने अंतर्गत अन्नधान्य वस्तुचे किट पालकमंत्री आदिती तटकरे यांचे हस्ते वाटप करण्यात आले. या वेळी त्यांचे समावेत तालुका अध्यक्ष समीर बनकर, जिल्हा परिषद सभापती बबन मनवे, सभापती छायाताई म्हात्रे, उपसभापती संदीप चाचले, प.स.सदस्य मधुकर गायकर, माजी सभापती उज्वला सावंत, प्रादेशिक व्यवस्थापक दिपक अंबावडे, प्रकल्प अधिकारी शशिकला आहिराव, क्रीडा उपसंचालक संजय महाडीक, प्रांतअधिकारी अमित शेडगे, निना. तहसीलदार के.टी.भिंगारे, जिल्हा क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर, तालुका क्रीडा अधिकारी संदीप वांजळे, उपकार्यकारी अभियंता गणगणे, जेष्ठ नेते अंकुश खडस आदी मान्यवर उपस्थित होते. आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत योजनेचा



शुभारंभ म्हसळा,श्रीवर्धन आणि तळा या तीन तालुक्यातील आदिवासी कुटुंबाना खावटी वाटप करून करण्यात आला. कोरोना प्रादुर्भाव कालावधीत आदिवासी कुटुंबाचा उपजीविकेचा साधन व रोजगार बंद पडल्याने त्यांना वेळीच मदत व्हावी यासाठी शासनाच्या आदिवासी विकास प्रकल्पा मार्फत जिल्ह्यातील सर्वच कुटूंबाना खावटी वाटप करण्यात येणार असल्याचे प्रकल्प अधिकारी श्रीमती शशिकला अहिराव यांनी प्रास्तविक करताना सांगितले. खावटी वाटप योजनेचा शुभारंभ म्हसळा, श्रीवर्धन आणि तळा तालुक्यातील प्रत्येकी १० असे मिळून ३० आदिवासी कुटुंबाना करण्यात आले आहे. प्रकल्प कार्यालयाकडे सुमारे ३४ हजार अन्नधान्य किट उपलब्ध झाले आसुन खावटी योजनेच्या निवासी व स्थलांतरित प्रत्येक कुटुंबातील लाभार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे. जिल्ह्यातील निवासी कुटुंबातील २९ हजारहुन अधिक लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली आहे तर ५ हजार हुन अधिक लाभार्थी स्थलांतरित असल्याचे सांगण्यात आले. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात आदिवासी पाड्यात आदिवासी कुटुंबाला त्या त्या पाड्यातील शाळा शिक्षका करवी अन्नधान्य किट उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे प्रकल अधिकारी शशिकला आहिराव यांनी उपस्थिताना माहिती देताना सांगितले.

## जांभूळपाडा कळंब रस्त्यावरील तांबड ओढा येथील मोरवी खचली

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यात जांभूळपाडा कळंब रस्त्यावर असलेली, तांबडओढा जवळील मोरवी काही दिवसापूर्वी खचली आहे. यामुळे पुन्हा एकदा अपघातांना निमंत्रण अशी स्थिती निर्माण झाली आहे.

जांभूळपाडा कळंब मार्ग वाहतूक व प्रवासासाठी महत्वाचा मानला जातो, मात्र मोरवी च्या दुरावस्थेने हा प्रवास करणे म्हणजे जीवाला धोका आहे. या ठिकाणी दिवसा व रात्री एखादा जीवघेणा अपघात कधीही होऊ शकतो, यामुळे प्रवासीवर्गाचे हृदयाचे ठोके वाढतच आहे. जिव मुठीत घेऊन प्रवास करण्याची वेळ नागरिकांवर आलीय. हा रस्ता दळणवळणा साठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या रस्त्यावर वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणत सुरू असते. मोरवी खचल्याने अपघाताची भीती वाढली आहे. या रस्त्याला कळंब, कळंब आदिवासी वाडी, कळंबधनगर वाडा, जाधव वाडी. फलसुंडे, कासरवाडी, असरे , नवघर, मुळशी आदी गावे याच मार्गावर आहेत. यामुळे नेहमी वाहने, माणसे ये जा करीत असतात. सदर मार्गाचा जांभूळपाडा ते पाली बायपास म्हणून वापर केला जातो. त्यामुळे हा मार्ग सुस्थितीत असणे गरजेचे आहे. यासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणत निधी ही काही वर्षापासून खर्च करण्यात येत आहे.